महाराष्ट्र शिक्षण समिती द्वारा संचलित

# महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

ता. निलंगा जि. लातूर

# पर्यावरण प्रकल्प कार्य पुस्तिका



महाराष्ट्र शिक्षण समिती द्वारा संचलित

# महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

निलंगा

## प्रमाणपत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, कुमार / कुमारी गायकवाड अश्विनी तानाजी इयत्ता B.A.T.Y हजेरी क्रमांक ________ शैक्षणिक वर्ष २०-२०23 मधील प्रकल्प कार्य पर्यावरण (Enviro) या विषयावर मार्गदर्शक शिक्षक / प्राध्यापकाच्या मार्गदर्शनाखाली अपेक्षित सर्व कामकाज, माहिती संकलन व अहवाल लेखन विद्यापीठाच्या कला लेखन नियमाप्रमाणे प्रकल्प कार्य तयार केलेले आहे. सदर प्रकल्प कार्य हे संबंधित विद्यार्थ्याने स्वत: संकलित केलेले आहे.

सदर प्रकल्प कार्य हे संबंधित विर्थ्याने स्वत: संकलित केलेल्या लेखन सामग्रीवर आधारित असून स्वत:च्या हस्ताक्षरात लिहिले आहे.

दिनांक : 30-10-2023

मार्गदर्शक | परिक्षक | प्राचार्य / उपप्राचार्य

Principal
Maharashtra Mah... 
Nilanga 4135...

## अनुक्रमणिका


| अ.क्रं. | घटकाचे नाव | पान क्रं. |
|---|---|---|
| 1. | प्रकल्पाचे नाव वनसंपदा | |
| 2. | अतिवापर व उपयोग | |
| 3. | निर्वणीकरण | |
| 4. | कारणे व परिणाम | |
| 5. | पर्यावरणीय परिणाम | |
| 6. | लाकुडतोड | |
| 7. | जंगलतोडीचे परिणाम | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |




* वनसंपदा *

1) वनसंपदा (Forest - Resources)

वनसंपदा ही सर्व नैसर्गिक साधन संपदामध्ये अत्यंत महत्वाची आहे. पर्यावरण संतुलनासाठी वनसंपदा अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही प्रदेशातील पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी 33 टक्के क्षेत्र हे वनाच्छादित असले पाहिजे.

वनसंपदेचा अतिवापर व उपयोग :-

वनसंपदा ही मानवी जीवनात महत्वाचे स्थान आढ धारण करून पहात आहे. मानवी जीवनाच्या अनेक गरजा वनसंपदेपासून भागविल्या जातात. अनादी, अनंत काळापासून आजपर्यंत मानव हा जंगलावर अवलंबून आहे. फार पूर्वी मानव हा जंगलात राहत होता. आजही काही आदिवासी जमाती जंगलावरच राहतात. त्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या महत्वाच्या गरजा संपूर्णपणे जंगलावरच अवलंबून आहेत. वनाधारीत व्यवसाय करून ते आपला चरितार्थ चालवितात.

आपल्या जगामध्ये जंगलतोड ही मोठ्या प्रमाणावर होत आहे. जंगलांच्या अति वापरामुळे आज अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. अनेक पर्यावरणीय समस्या आज भेडसावत आहेत. प्रचंड वृक्षतोडीमुळे अनेक देशामध्ये वनाखालील क्षेत्र कमी होत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळला गेला आहे. जागतिक तापमानात वाढ, पावसाचे दिवसेंदिवस कमी होत चाललेले प्रमाण, कार्बनडाय ऑक्साईडच्या प्रमाणात वाढ, ओझोन थर-क्षय जंगली प्राण्यांचा -हास, वाळवंटीकरण मातीचा धर क्षय, जंगली प्राण्यांचा ऱ्हास महापूर इत्यादी पर्यावरणीय समस्या जंगलतोडीमुळे निर्माण होतात.

मानव आज स्वार्थासाठी बेसुमार वृक्षतोड करीत आहे. नवीन झाडे लावण्यापेक्षा झाडे तोडण्यावरच भर आहे. वनस्पती लाकडासाठी, औषधासाठी इंधन म्हणून तसेच उपयोग आणले जातात. अलिकडच्या काळात प्रचंड जंगतोड करून त्याठिकाणी शेती केली जाते तसेच अनेक कारखाने काढले जात आहेत. मानव जंगलांच्या बाबतीत निष्काळजीपणाचे वर्तन आहे त्यासाठी कायदा कडक करण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

असे म्हटले जाते "मानवाचा खून तीनशे दोन अंड्याचा खून विचारतो कोण" सगळेच प्रश्न कायद्याने सुटत नाहीत पण कोणतरी बंधने ही निर्माण झालीच पाहिजेत. अनिर्बंध कृत्यांचे परिणाम आज मानवासमोर येत आहेत. पर्यावरणीय परिसंस्थांचा समतोल आज ढासळत चालला आहे.

जंगलापासून मानवाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष फायदे मानवाचे मूळ वस्तीस्थान ही जंगलेच आहेत. जंगलापासून मानवास लाकूड हा मुख्य उत्पादन घटक तर मिळतोच त्याच बरोबर जंगलापासून अनेक उपपदार्थही मिळतात. उदा. खाद्यपदार्थ, वस्त्र, औषधी, पदार्थ, पाने, डिंक लाख, टॅनिक, टर्पेंटाइन, मध, विविध तेल, कंदमुळे. इ.

पर्यावरणाच्या दृष्टीने जंगलाचा वापर अत्यंत चांगल्या पद्धतीने होतो. जंगलापासून जे अप्रत्यक्ष फायदे मिळतात त्यालाच पर्यावरणीय फायदे असे म्हणतात. जंगलांचा पर्यावरणीय वापर पुढील बाबींमुळे होतो. पावसाच्या प्रमाणात वाढ, आर्द्रतेत वाढ जलसंवर्धन, थंड हवामान, जमिनीखालील पाण्याच्या पातळीत वाढ, मृदाधूप नियंत्रण पूरनियंत्रण, मृदा सुपीकतेत वाढ, वन्य पशुपक्ष्यांचे संरक्षण व संवर्धन वादळा-पासून संरक्षण, वाळवंटीकरणाला मर्यादा